# अनिता मुरजानी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

मी कोण आहे ? याचा शोध घेणे हे जीवनाचे अंतिम सत्य आहे. जीवनात ताण तणाव घेऊ नका, भविष्याचा विचार करू नका, जगत असलेला प्रत्येक क्षण उत्तम करण्याचा प्रयत्न करा. जीवनाचा हेतू हसणे आणि निरपेक्ष प्रेम करणे आहे, असे मत लेखिका अनिता मुरजानी यांनी व्यक्त केले. न्यूयॉर्क टाइम्सच्या 'डाइंग टू बी मी' या पुस्तकाचा मराठी अनुवाद '...आणि त्या दिवशी माझा मृत्यू झाला' चे 'वॉव पब्लिकेशन' तर्फे नुकतेच अनिता मुरजानी यांच्या हस्ते प्रकाशन झाले त्या वेळी त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम डेक्कन जिमखाना येथील बुक गंगा इंटरनॅशनल सर्व्हिसेस येथे संपन्न झाला. कार्यक्रमात अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक मिलिंद जोशी उपस्थित होते.

लोकसत्ता Wed, 15 July 2015
epaper.loksatta.com/c/588217